# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे-०४

## * प्रकटन *

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना खाजगीरित्या फॉर्म नं.१७ भरून परीक्षेस प्रविष्ट होण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

त्यानुसार फेब्रुवारी/मार्च २०२० च्या माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे नावनोंदणी अर्ज (फॉर्म नं.१७) ऑनलाईन प्रक्रियेद्वारे स्विकारण्याचा कालावधी दिनांक २९/०७/२०१९ पासून ते दिनांक २९/११/२०१९ पर्यंत निश्चित करण्यात आला होता.

या बाबत आपणास सुचित करण्यात येते की, खाजगीरित्या इ.१० वी व इ.१२ वी साठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी अर्ज अतिविलंब शुल्काने ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहेत. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी खालील वेबसाईटचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी / इंग्रजी मधून उपलब्ध आहेत त्या वाचून अर्ज भरण्यास सुरूवात करावी.

१. **इ.१० वी व इ.१२ वी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्याच्या** विलंब व अतिविलंबाच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र | **माध्यमिक शाळांनी / कनिष्ठ महाविद्यालयांनी अतिविलंब शुल्क प्रती विद्यार्थी रूपये २०/- प्रतिदिन स्विकारुन विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने नाव नोंदणी अर्ज भरावयाच्या तारखा (इयत्ता १० वी व १२ वी)** |
|---|---|
| १ | **शनिवार** दिनांक **१४/१२/२०१९**<br>ते<br>**शुक्रवार** दिनांक **२०/१२/२०१९** |

२. खाजगी विद्यार्थ्यांनी इ.१० वी व इ.१२वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

३. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी खालील वेबसाईटचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी/इंग्रजीमधून उपलब्ध आहेत त्या वाचून अर्ज भरण्यास सुरूवात करावी.

**संकेतस्थळ-** **इयता १० वी - http://form17.mh-ssc.ac.in**

**इयता १२ वी - http://form17.mh-hsc.ac.in**

४. विद्यार्थ्यांने अर्ज भरण्याकरीता **१)** शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत), मूळप्रत नसल्यास व्दितीयप्रत व प्रतिज्ञापत्र किंवा महा ई-सेवा केंद्र सेतू मधून दुय्यम दाखला सादर करीत असलेबाबतचे प्रतिज्ञालेख **२)** मूळ मार्कशिट, व मूळ प्रमाणपत्र, **३)** आधारकार्ड ४) स्वत:चा सद्याचा पासपोर्ट आकारातील फोटो इत्यादी कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत.

५. कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर/मोबाईलव्दारे कागदपत्रांचे फोटो काढून ते अपलोड करावेत. **विद्यार्थ्यांचा त्यांचा ई-मेल आयडी व पुढील संपर्कासाठी मोबाईल क्रमांक अनिवार्य आहे.**

६. संपूर्ण अर्ज भरुन झाल्यावर भरलेल्या अर्जाची प्रत विद्यार्थ्याला त्याने अर्जात नमूद केलेल्या ई-मेल वर पाठविली जाणार आहे. तसेच या भरलेल्या संपूर्ण अर्जाची प्रिंटआउट, शुल्क पावती व हमीपत्र यासह दोन प्रतीत काढून घ्यावी.

दिनांक- १६.१२.२०१९

विभागीय सचिव,
कोल्हापुर विभागीय मंडळ,कोल्हापूर

Letter /pawar